जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५०५ दिनांक - ०२/१२/२०२४**

युनिट ६ गुन्हे शाखा पुणे शहर

## अवघ्या ०४ तासांत हरवलेल्या अल्पवयीन मुलाच्या पालकांचा शोध

**ऑपरेशन मुस्कान अंतर्गत** अल्पवयीन मुलांची शोध मोहिम राबविणेबाबत मा.वरिष्ठांनी आदेश केले होते आज रोजी यूनिट ६ कडील अंमलदार महिला पोलीस अंमलदार प्रतिक्षा पानसरे, पोलीस अंमलदार सचिन पवार असे युनिट ६ हददीत गस्त करीत असताना बाईफरोडवरील येथील निखार लेडीज शॉप जवळ, वाघोली, पुणे येथे महीला नामे मनिषा चेतन सोनार हीने सांगितले की, एक लहान मुलगा नाव पत्ता माहीत नाही वय अंदाजे ३ वर्ष अंगात हिरवे रंगाचा टि शर्ट त्यावर नारंगी रंगाचे जॅकेट व पांढरे रंगाचे पॅन्ट हा रोडवर सापडला आहे. त्यास युनिट ६ गुन्हे शाखा कार्यालय येथे घेवुन येवून सदरबाबत वपोनि श्री.वाहिद पठाण यांना कळविले असता त्यांनी घटनेचे गांभिर्य लक्षात घेवुन गुन्हे शाखा युनिट ६ पथकाच्या वेगवेगळया टिम बनवुन वाघोली हद्दीत मुलाचे नातेवाईक यांचा शोध घेणेबाबत आदेशित केले. स्थानिक परिसरातील सर्व सोशल मिडीयावर सदर मुलाचा वर्णनासह फोटो प्रसिध्द करुन नियंत्रण कक्ष,पुणे शहर येथे अनोळखी मुलगा मिळुन आले बाबत माहीती देण्यात आली.

गुन्हे शाखा युनिट ६ कडील पथकाने डोमखेल रोड, बाईफ रोड, दत्तविहार रोड या परिसरातील सोसायटया, लेबर कॅम्प येथे शोध घेतला असता अक्षय संकृती सोसायटी, बाईफ रोड, वाघोली, पुणे येथे एक महिला तिचे मुलास शोधत असलेबाबत माहिती मिळाली. नमूद महिलेस सदर मुलाचा फोटो दाखवला असता तिने सदरचा मुलगा माझा असल्याचे सांगितलेने त्याबाबत खात्री करुन त्याची आई यांचे ताब्यात सुखरुप देण्यात आले आहे. त्यानंतर अवघ्या ४ तासांत अल्पवयीन शोध घेतल्याने त्यांनी पुणे शहर पोलीस दलाचे आभार मानले आहे. तसेच सतर्क नागरिक मनिषा चेतन सोनार यांचेदेखील आभार मानले आहेत.

सदरची कामगीरी मा. अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शैलेश बलकवडे, मा.पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री. निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री राजेंद्र मुळीक गुन्हे शाखा, युनिट -६ यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट -६ चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री.वाहिद पठाण, सहा.पोलीस निरीक्षक मदन कांबळे,पोलीस उपनिरीक्षक रामकृष्ण दळवी, पोलीस अंमलदार रमेश मेमाणे,बाळासाहेब सकटे, सुहास तांबेकर, कानिफनाथ कारखेले, ऋषीकेश ताकवणे, सचिन पवार, ऋषीकेश व्यवहारे, गणेश डोंगरे, नितीन धाडगे, बाळासाहेब तनपुरे, मपोअं.प्रतिक्षा पानसरे, किर्ती मांदळे यांनी केली आहे.